प्रधानमंत्री धन धान्य कृषि योजनेस
प्रशासकीय मान्यता देणेबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : कृवपदुम १२०२७/३२/२०२६ MAG-1A**
**संगणक क्रमांक : १६१००७६**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, विस्तार, मुंबई- ४०००३२
दिनांक : २१ एप्रिल, २०२६

**प्रस्तावना:**

केंद्र शासनाने सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पामध्ये कमी उत्पादनक्षमता, मध्यम पीक तीव्रता आणि सरासरी पेक्षा कमी कर्जवाटप असलेले देशातील शंभर आकांक्षित जिल्हे प्रधानमंत्री धनधान्य कृषि योजनेखाली विकसित करण्याचा निर्णय घेतला आहे. कृषि उत्पादनात वाढ करणे, पिकांमध्ये विविधता वाढवणे व शाश्वत कृषि पद्धतीचा पुरस्कार करणे, ग्रामपंचायत व तालुका पातळीवर साठवणूक क्षमता वाढविणे, सिंचन सुविधांमध्ये वाढ करणे आणि अल्प व दीर्घ मुदतीची कर्ज सुविधा उपलब्ध करुन देणे हे या योजनेचे उद्देश आहेत. सदर योजना ५ वर्षांच्या कालावधीसाठी विद्यमान केंद्र व राज्य योजनांच्या अभिसरणाद्वारे राबविली जाणार आहे.

१.२ केंद्र शासनाने निश्चित केलेल्या देशभरातील शंभर आकांक्षित जिल्ह्यांमध्ये महाराष्ट्रातील पालघर, यवतमाळ, गडचिरोली, धुळे, रायगड, चंद्रपूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड आणि बीड या ९ जिल्ह्यांचा समावेश आहे. सदर जिल्ह्यांमध्ये प्रधानमंत्री धनधान्य कृषि योजना राबविण्यास मान्यता देण्याची बाब राज्य शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय**:

महाराष्ट्रातील पालघर, यवतमाळ, गडचिरोली, धुळे, रायगड, चंद्रपूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड व बीड या ९ जिल्ह्यांमध्ये प्रधानमंत्री धनधान्य कृषि योजना राबविण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी राज्य व जिल्हा स्तरावर खालीलप्रमाणे समित्या गठित करण्यात येत आहेत :-

**अ) राज्य धन धान्य कृषि योजना समिती:-**

- **राज्य धन धान्य कृषि योजनेची रचना खालीलप्रमाणे असेल:-**

| अ.क्र. | मुख्य सचिव | अध्यक्ष |
|---|---|---|
| १ | अ.मु.स/प्र.स./सचिव (कृषि) | सदस्य सचिव |
| २ | अ.मु.स./प्र.स./सचिव (नियोजन) | सदस्य |
| ३ | अ.मु.स./प्र.स./सचिव (वित्त) | सदस्य |
| ४ | अ.मु.स./ प्र.स./सचिव (ग्राम विकास) | सदस्य |
| ५ | अ.मु.स./ प्र.स./सचिव (मत्स्यव्यवसाय) | सदस्य |
| ६ | अ.मु.स./ प्र.स./सचिव (पशुसंवर्धन व दुग्धविकास) | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ७ | अ.मु.स./ प्र.स./सचिव (सहकार व पणन) | सदस्य |
| ८ | अ.मु.स./ प्र.स./सचिव (जलसंपदा) | सदस्य |
| ९ | अ.मु.स./ प्र.स./सचिव (जलसंधारण) | सदस्य |
| १० | अ.मु.स./ प्र.स. /सचिव (उद्योग) | सदस्य |
| ११ | सर्व राज्य कृषी/ फलोत्पादन/ मत्स्य व्यवसाय/ पशुवैद्यकीय विद्यापीठांचे कुलगुरू | सदस्य |
| १२ | आयुक्त (कृषि) | सदस्य |
| १३ | आयुक्त (सहकार) | सदस्य |
| १४ | आयुक्त (पशुसंवर्धन) | सदस्य |
| १५ | आयुक्त (दुग्धविकास) | सदस्य |
| १६ | आयुक्त (मत्स्यव्यवसाय) | सदस्य |
| १७ | आयुक्त (जलसंधारण) | सदस्य |
| १८ | संचालक (रेशीम संचालनालय) | सदस्य |
| १९ | राष्ट्रीय कृषि व ग्रामीण विकास बँक (NABARD) राज्य प्रतिनिधी | सदस्य |
| २० | राज्यस्तरीय बँकर्स समितीचे निमंत्रक | सदस्य |
| २१ | उपसचिव (कृषि) | सदस्य |

अध्यक्षांना राज्य सरकारच्या मान्यतेने इतर कोणत्याही संबंधित सदस्याला सह-नामांकित करण्याचा अधिकार असेल.

- **राज्य धन धान्य कृषि योजना समितीची कार्यकक्षा पुढीलप्रमाणे असेल**:-

१. जिल्ह्यांनी तयार केलेला जिल्हा कृती आराखडा हा परिपूर्ण असल्याबाबत खात्री करून जिल्हा कृती आराखड्यामध्ये Project mode मध्ये अभिसरण केलेल्या सर्व योजनांना पुरेशा निधीचे सुनिश्चितीकरण (adequate fund flow) करणे, वेळेवर निधी वितरीत करणे व सर्व विभागांमध्ये अभिसरण सुनिश्चित करणे.

२. जिल्हा योजनांमध्ये निविष्ठांव्यतिरिक्त विपणन आणि मूल्यवर्धन या बाबींचा समावेश असेल, परंतु राज्य विभागांनी विशेषत: या जिल्ह्यांमधील उत्पादनांच्या विपणन, ब्रँडिंग आणि मूल्यवर्धनाला सहाय्य (support) करणे अपेक्षित आहे.

३. जिल्हा धनधान्य योजना समितीने तयार केलेल्या जिल्हा कृती आराखड्याच्या अंमलबजावणीचा त्रैमासिक सविस्तर आढावा घेऊन संनियंत्रण करणे.

४. क्षेत्रीय स्तरावरील पदे भरल्याबाबत, निधी वेळेवर वितरीत होत असल्याबाबत आणि सर्व यंत्रणांचे जिल्ह्याला आवश्यक सहकार्य मिळत असल्याबाबत खात्री करणे.

५. आर्थिक वर्ष सुरु होण्यापूर्वी सर्व विभागांच्या वार्षिक योजना संबंधित विभागांनी प्रत्येक योजनेच्या वार्षिक योजनेमध्ये समाविष्ट केल्याबाबतची खात्री करणे.

६. सदर योजनेकरिता केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांतील नमूद जबाबदाऱ्यांनुसार तसेच केंद्र शासनाकडून वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या सूचनांनुसार कामकाज होत असल्याबाबतची खात्री करणे.

**ब) जिल्हा धन धान्य कृषि योजना समिती:-**

- **जिल्हा धन धान्य कृषि योजनेची रचना खालीलप्रमाणे असेल:-**

| अ.क्र. | जिल्हाधिकारी (संबंधित जिल्हा) | अध्यक्ष |
|---|---|---|
| १ | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (संबंधित जिल्हा)(प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा) | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| २ | प्रकल्प संचालक (आत्मा) | सदस्य |
| ३ | जिल्हास्तरीय मत्स्यव्यवसाय विभागाचे अधिकारी | सदस्य |
| ४ | जिल्हास्तरीय पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी | सदस्य |
| ५ | जिल्हा निबंधक सहकारी संस्था | सदस्य |
| ६ | जिल्हा रेशीम अधिकारी | सदस्य |
| ७ | जिल्हा दुग्ध विकास अधिकारी | सदस्य |
| ८ | जिल्हा जलसंधारण अधिकारी | सदस्य |
| ९ | कार्यकारी अभियंता, जलसंपदा | सदस्य |
| १० | अग्रणी बँक अधिकारी | सदस्य |
| ११ | राष्ट्रीय कृषि व ग्रामीण विकास बँक (NABARD) प्रतिनिधी | सदस्य |
| १२ | कृषी विज्ञान केंद्राचा प्रमुख शास्त्रज्ञ | सदस्य |
| १३ | दोन प्रगतिशील शेतकरी (केंद्र शासनाद्वारे नामनिर्देशित) | सदस्य |
| १४ | किसान समृद्धी केंद्राचे प्रतिनिधी | सदस्य |
| १५ | इतर निमंत्रित सदस्य | सदस्य |
| १६ | जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी | सदस्य सचिव |

- **जिल्हा धन धान्य कृषि योजनेची_समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे असेल :-**

१. प्रस्तुत योजनेंतर्गत निवडलेल्या प्रत्येक आकांक्षित कृषि जिल्ह्यांमध्ये जिल्हा कृषी आणि संलग्न उपक्रमांचा सर्वसमावेशक कृती आराखडा तयार करणे. सर्व सहभागी भागधारकांची बैठक आयोजित करून तयार केलेल्या जिल्हा कृति आराखडा हा क्रियाभिमुख (Action oriented) असल्याची खात्री करणे.

२. वार्षिक योजनेची अंमलबजावणी सुनिश्चित करणे व आवश्यकतेनुसार त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी किमान एक मासिक बैठक आयोजित करणे. दर सहा महिन्यांच्या शेवटी, पतपुरवठ्याचे सार्वत्रिकरण, पीक तीव्रता आणि काढणीपश्चात मूल्यवर्धन या नियोजित लक्ष्यांकांचा सविस्तर आढावा घेणे.

३. सर्व संलग्न क्षेत्रांसह कृषी उत्पादकता आणि कर्जाच्या स्थितीचा आढावा घेणे,

४. सर्व विभागांची सांगड घालून जिल्ह्यामध्ये सर्वात मागे असलेले तालुके आणि गावांवर लक्ष केंद्रित करणे.

५. खासगी क्षेत्राला सहभागी करून घेऊन मोठ्या प्रमाणावर नाविन्यपूर्ण परिवर्तन सुलभ करणे.

६. नियोजनाव्यतिरिक्त नियमित आढावा घेऊन विविध घटकांची अंमलबजावणी करून नीती आयोगाच्या डॅशबोर्डवर वेळोवळी माहिती अद्ययावत करणे.

- **योजनेसाठी निधीची व्यवस्था:-**

प्रस्तुत योजनेसाठी स्वतंत्रपणे निधी देण्यात येणार नसून विविध विभागांअंतर्गत (कृषि/ मत्स्यव्यवसाय/ पशुसंवर्धन/ दुग्धव्यवसाय विकास/ सहकार/ ग्रामविकास/ जलसंपदा/ कौशल्य विकास) असलेल्या विविध योजनांच्या अभिसरणाद्वारे राबविली जाणार आहे.

सदर योजनेच्या क्षेत्रीय पातळीवरील अंमलबजावणीचा तपशील ठरविण्याकरीता आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

प्रस्तुत शासन निर्णय मा. मुख्यमंत्री महोदयांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक २०२६०४२११६०८५११२०१ असा आहे

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SUHAS MADHUSUDAN SAKPAL

Digitally signed by SUHAS MADHUSUDAN SAKPAL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=AGRICULTURE AND ADF DEPARTMENT,
2.5.4.20=01592dd98f36fbc924826517361a31b8166fce7745d35b95fa79159b8fb74478, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=82434617B1F4C6035B3CC29788B8D394A52FB3EDABFC26B4E85EBC2AF7C45FF9, cn=SUHAS MADHUSUDAN SAKPAL
Date: 2026.04.21 16:12:21 +05'30'

**( सुहास सकपाळ )**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उपमुख्यमंत्री (नगरविकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) ) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक विकास व औकाफ) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
५) मा. मंत्री (कृषि) यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मा. मंत्री (फलोत्पादन) यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७) मा.राज्यमंत्री (कृषि) यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
८) मा. विरोधी पक्षनेता (विधानसभा/परिषद), महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई.
९) मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
१०) अ.मु.स (नियोजन) यांचे स्वीय सहायक, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) अ.मु.स (वित्त) यांचे स्वीय सहायक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२) अ.मु.स. (जलसंपदा) यांचे स्वीय सहायक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३) प्र.स. (ग्रामविकास) यांचे स्वीय सहायक, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) प्र.स. (सहकार व पणन) यांचे स्वीय सहायक, सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५) प्र.स. (उद्योग) यांचे स्वीय सहायक, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६) सचिव (कृषि) यांचे स्वीय सहायक, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७) सचिव (जलसंधारण) यांचे स्वीय सहायक, मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८) सचिव (पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्सव्यवसाय विभाग) यांचे स्वीय सहायक, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
१९) कुलगुरू, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी.
२०) कुलगुरू, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.
२१) कुलगुरू, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी.
२२) कुलगुरू, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.
२३) कुलगुरू, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर.
२४) आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२५) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
२६) आयुक्त (पशुसंवर्धन), महाराष्ट्र राज्य, पुणे
२७) आयुक्त (दुग्धविकास), महाराष्ट्र राज्य, वरळी, मुंबई.
२८) आयुक्त (मत्स्यव्यवसाय), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२९) आयुक्त (जलसंधारण), मृद व जलसंधारण आयुक्तालय, औरंगाबाद.
३०) संचालक, रेशीम संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३१) मुख्य महाव्यवस्थापक, राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक, मुंबई.

३२) सहायक महाव्यवस्थापक, राज्यस्तरीय बँकर्स समिती, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३३) सर्व कृषि संचालक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३४) जिल्हाधिकारी (पालघर, यवतमाळ, गडचिरोली, धुळे, रायगड, चंद्रपूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड व बीड)
३५) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद (पालघर, यवतमाळ, गडचिरोली, धुळे, रायगड, चंद्रपूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड व बीड)
३६) महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा) परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
३७) सर्व विभागीय कृषि सहसंचालक.
३८) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
३९) सहाय्यक संचालक, लेखा १, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४०) अवर सचिव (का-१४३१),नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
४१) अवर सचिव वित्त विभाग (व्यय-१), मंत्रालय, मुंबई.
४२) निवड नस्ती (१-अे).